थोडक्यात

रस्ताप्रश्नी ग्रामस्थ आंदोलनाच्या पवित्र्यात

येवला । तालुक्यातील तळवाडे (विठ्ठलवाडी) – गवंडगाव तसेच गारखेडा ते देवठाण या रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. गेल्या पंधरा-वीस वर्षापासून या रस्त्यासंदर्भात ग्रामस्थ प्रशासन आणि लोकप्रतिनिधीकडे पाठपुरावा करत आहेत. मात्र, आतापर्यंत या रस्त्याची कुणी दखल न घेतली नाही. त्यामुळे ग्रामस्थ आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत.

रस्त्यावर दोन- दोन, तीन – तीन फुटाचे मोठ मोठे खड्डे पडल्याने विठ्ठलवाडी (तळवाडे) परिसरातील नागरिक, विद्यार्थ्यांना अक्षरशः खड्ड्यातून चिखल तुडवत जावे लागत आहे पावसाळ्यात या रस्त्याने रुग्णवाहिका वा इतर चारचाकी गाडी येवू शकत नसल्याने रुग्णांना व गरोदर महिलांना दोन किलोमीटर झोळी करून नेण्याची वेळ विठ्ठलवाडी परिसरातील नागरिकांवर आली आहे.

एसटी कर्मचाऱ्यांना शासकीय दर्जा

सवलतींसाठी लवकरच आंदोलनाची दिशा : छाजेड

नाशिक - प्रतिनिधी

एसटी कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा, वेतनवाढ आणि मूलभूत सुविधा मिळाव्यात, यासाठी लवकरच आंदोलनाची दिशा ठरविणार असल्याचे महाराष्ट्र एसटी वर्कर्स काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष प्रीतीश छाजेड यांनी जाहीर केले.

महाराष्ट्र एसटी वर्कर्स काँग्रेसच्या नाशिक विभागीय कार्यालय आणि वर्कशॉप येथील फलकांचे अनावरण छाजेड यांच्या हस्ते रविवारी (दि.२४) करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

छाजेड म्हणाले, स्व. जयप्रकाश छाजेड यांनी आपले संपूर्ण आयुष्य एसटी कर्मचाऱ्यांच्या हितासाठी आणि त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी समर्पित केले. त्यांचा हा वसा पुढे नेण्यासाठी आम्ही ही संघटना स्थापन केली आहे. महाराष्ट्र एसटी वर्कर्स काँग्रेसचे अध्यक्ष ज्येष्ठ कामगार नेते ज्ञानोबा लिपणे यांनी संघटना विस्तारासाठी लवकरच राज्यभर दौरा करणार असून, त्याची सुरुवात नाशिकमधून झाल्याचा आनंद व्यक्त केला. नाशिक शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आकाश छाजेड यांनी काँग्रेस पक्ष एसटी कर्मचाऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभा राहील आणि संघटनेला बळकटी देण्यासाठी प्रयत्न करेल, असे सांगितले.

यावेळी संघटनेचे अध्यक्ष डी. ए. लिपणे, महिला आघाडी प्रदेशाध्यक्ष अर्चना बोंबले, राज्य कार्याध्यक्ष रमेश शिंदे, सरचिटणीस आर. डी. गवळी, अशोक जाधव, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते उल्हास सातभाई, प्रदेश काँग्रेस सचिव ज्ञानेश्वर गायकवाड, नाशिक आगारातील अशोक मुळे, सोमनाथ बोडके, अशोक भोये, संतोष ठाकूर, गौरव सोनार, हनीफ बशीर, जावेद इब्राहिम, भालचंद्र पाटील, फारूक मन्सुरी, रोहन कातकाळे, मुस्ताक कुरेशी, असलम पहिलवान, राजकुमार जेफ, शहबाज मिर्झा, भारती तोकडे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

पिंपळस विद्याभवनचे कुस्ती स्पर्धेत यश

भा.नगर । पिंपळस रामाचे के.के. वाघ माध्यमिक विद्याभवनने भाऊसाहेबनगर येथे झालेल्या तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत यश संपादन केले आहे. त्यामुळे जिल्हास्तरीय स्पर्धेत निवड झाली आहे.

स्पर्धेत १४ वर्षे मुलांच्या गटात आदित्य भोंगाळ व सम्यक शिंदे, १४ वर्षे मुलींच्या गटात आरती माळी, वैशाली जाधव व १७ वर्षे मुलांच्या गटात निशांत डांगळे, जयेश निंबाळकर या कुस्तीपटूंनी तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळवले. तसेच भारती जाधव, दीक्षा शिंदे, अक्षरा त्रिभुवन, सौरभ भोंगाळ, दीपक लिलके, आदित्य गांगुर्डे, साहिल पानसरे, प्रणित साळवे, आदित्य नवघरे आदी खेळाडूंनी विविध गटातून उत्तम प्रदर्शन करुन चमकदार कामगिरी केली आहे. खेळाडूंना दीपक कुंभार यांनी मार्गदर्शन केले. यशस्वी खेळाडू व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्था अध्यक्ष समीर वाघ, विश्वस्त शकुंतला वाघ, जनसंपर्क प्रमुख अजिंक्य वाघ, सचिव के.एस. बंदी आदींसह ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

बदली प्रक्रिया न्यायालयाच्या कक्षेत

नाशिक । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागात मे २०२५ मध्ये राबवण्यात आलेल्या कर्मचारी बदल्यांच्या प्रक्रियेवरून निर्माण झालेला वाद आता कायदेशीर वळणावर पोहोचला आहे.

महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद महासंघाने या बदल्यांविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे, तर यापूर्वीच नाशिकच्या औद्योगिक न्यायालयातही याचिका प्रलंबित आहे. या प्रकरणाने जिल्हा परिषदेच्या बदली प्रक्रियेच्या वैधतेला आव्हान दिले असून ग्रामपंचायत विभागातील बदली प्रक्रिया पूर्णपणे न्यायालयाच्या कक्षेत आली आहे. औद्योगिक न्यायालय आणि उच्च न्यायालयातील सुनावणीनंतर या बदल्यांचे भवितव्य ठरेल.

जिल्हा परिषदेने मे महिन्यात जिल्हा अंतर्गत कर्मचारी बदली प्रक्रिया राबवली होती. यावेळी प्रशासनाने नियमानुसार १० टक्क्यांऐवजी १५ टक्के बदल्या करण्याचा निर्णय घेतला, ज्याला नंतर राज्य शासनाने मंजुरी दिली. मात्र, ग्रामसेवक संघटनेने या प्रक्रियेवर गंभीर आक्षेप नोंदवले. बदली प्रक्रियेदरम्यान रिक्त न दाखवलेल्या जागांवर ग्रामसेवकांच्या नियुक्त्या करण्यात आल्याचा आरोप संघटनेने केला आहे. या परस्पर नियुक्त्यांना कोणत्या नियमांचा आधार आहे, याबाबत प्रश्न उपस्थित करत संघटनेने त्वरित स्थगितीची मागणी केली आहे.

ग्रामसेवक संघटनेने याबाबत नाशिकच्या औद्योगिक न्यायालयात याचिका दाखल केली होती. मात्र, नाशिक औद्योगिक न्यायालय सुटीवर असल्याने ही याचिका ठाणे औद्योगिक न्यायालयाकडे वर्ग करण्यात आली. ठाणे न्यायालयाने आपले कार्यक्षेत्र मोठे असल्याचे कारण देत याचिकेवर सुनावणी घेण्यास नकार दिला आणि ती पुन्हा नाशिककडे वर्ग केली. अखेर नाशिकच्या औद्योगिक न्यायालयात याचिका दाखल झाली. पहिल्याच सुनावणीत न्यायालयाने ग्रामपंचायत विभागाचा दावा फेटाळला. विभागाने असा युक्तिवाद केला होता की, बदल्यांबाबत सुनावणी घेण्याचा अधिकार औद्योगिक न्यायालयाला नाही. मात्र, न्यायालयाने हा दावा नाकारत सुनावणी घेण्याचा निर्णय घेतला. या प्रकरणाची पुढील सुनावणी सप्टेंबर २०२५ मध्ये होणार आहे. दरम्यान, महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद महासंघाने उच्च न्यायालयात स्वतंत्र याचिका दाखल करून हा वाद आणखी तीव्र केला आहे. उच्च न्यायालयाने ही याचिका दाखल करून घेतली असून, कायदेशीर प्रक्रिया सुरू झाली आहे.

> उच्च न्यायालयाने आमची याचिका दाखल करून घेतली असून, पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू झाली आहे. बदली प्रक्रियेत झालेल्या अनियमिततांवर न्यायालयातूनच योग्य तो निर्णय मिळेल, असा आम्हाला विश्वास आहे.
>
> **– उमेशचंद्र चिलबुले**
> (राज्य अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद महासंघ)

टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, **मौजे सारूळ, ता.जि. नाशिक** या गावचे शिवारातील **गट नंबर १८७/प्लॉट/७** यांसी एकूण क्षेत्र ५.००.०० आर. चौ.मी. म्हणजेच ५००.०० चौ.मी. ही मिळकत **मे. एकर्स ग्रुप भागीदारी संस्था तर्फे भागीदार रितेश धरमपाल हंसवानी** यांचे मालकीची व कब्जेवहिवाटीची आहे. सदरील मिळकत निर्वेध व बोजारहित असल्याची खात्री त्यांनी दिलेली आहे. तथापि सदरील मिळकतीचे टायटल व्हेरिफिकेशनकामी प्रस्तुत नोटीस प्रसिध्द करीत आहे. सबब सदर मिळकतीवर कोणाचाही काहीएक बोजा जसे गहाण, दान, लिन, लिज, अन्नवस्त्र, बक्षीस, मृत्युपत्र, बोजे, विसार पावती व कोणत्याही प्रकारचे दस्त वगैरे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ०८ (आठ) दिवसांचे आत साक्षांकित पुराव्यासह आमचे खालील पत्त्यावर येऊन हरकत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला देण्यात येईल. मुदतीनंतर येणाऱ्या व परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द होणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. कळावे, ही टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहीर नोटीस. नाशिक, दि. २५/०८/२०२५

सही/- ॲड.निलेश काशिनाथ कोरडे ॲड.आशिक शरीफ कुरेशी

ऑफिस द्वारा- ॲड. आसिफ मजिद कुरेशी, बी/२१७, दुसरा मजला, मेघदूत शॉपिंग सेंटर, सी. बी. एस. समोर, नाशिक. मोबा. ८९७५३०९९१५/९५२७५८०३६९

टायटल व्हेरीफिकेशनसाठी जाहीर नोटीस

तमाम नागरिकांना या नोटीसीने कळविण्यात येते की, खालील **''परिशिष्ट अ''** मध्ये वर्णन केलेली मिळकत या मिळकतीचे मालक **श्री. राजेंद्र रंगनाथ जायभाये** यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबे, उपभोग, वहिवाटीस असलेली मिळकत आहे. सदर मिळकती संदर्भाने मिळकतीचे मालक यांनी आमचे पक्षकार यांचेकडून विसारापोटी रक्कम स्वीकारली आहे. सदर मिळकतीचे मालक हक्क तपासणेकामी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लिन, लिज, बक्षीस पत्र, अन्नवस्त्र, वारसा, कोर्ट वाद, साठेखत, जामिनकी, करार, विसारपावती, ज.मु., खरेदीखत इ. प्रकारचा हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, वारस असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **५ (पाच)** दिवसांचे आंत मुळ कागदपत्रांसह आमचे खालील पत्त्यावर येवून लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध समजून वर नमूद मालक यांना या मिळकतीबाबत निर्वेधपणाचा दाखला दिला जाईल. परस्पर वर्तमान पत्रात दिलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

परिशिष्ट– अ

मिळकतीचे वर्णन :– तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका नाशिक पैकी **मौजे – गोंदे** या गांवाचे शिवारातील शेत मिळकत यांसी गट नं. ५१६ यापैकी लिहून देणार यांच्या अविभक्त मालकी हिश्याचे क्षेत्र हे. ००.५४.३३ आर + पो.ख. हे. ००.०५.६७ आर यांसी आकार रु. ०.५० पैसे. यांसी चतुः सिमा रे. ऑ.रा. प्रमाणे. ही जाहीर नोटीस. ठिकाण – सिन्नर. दि.२५/८/२०२५. सही/-

आमच्या मार्फत प्रसिध्द
ॲड. सागर आनंदराव शेळके, ॲडव्होकेट
पत्ता – गाळा नं.२, लहामगे बिल्डींग, विजयनगर, सिन्नर. मो.९९६०७१६७१७

टायटल व्हेरीफिकेशनकामी जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, **मौजे चुंचाळे** या गावचे शिवारातील बिनशेती मिळकत यांसी **गट नंबर ६४/अ/प्लॉट/५७ यांसी एकूण क्षेत्र ३२५.०० चौ.मी.** ही प्लॉट मिळकत. उपरोक्त नमूद मिळकत ही **धिरेन्द्र अजित वाघ व पूनम धिरेन्द्र वाघ** यांचे मालकीची असून सदर मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची आहे अशी खात्री असून सबब, त्यांनी सदर मिळकतीचे स्वामित्व हक्क तपासणीचे काम आमचेवर सोपविलेले आहे. त्यासाठी सदरील टायटल व्हेरिफिकेशनकामी सदर नोटीस प्रसिद्ध केलेली आहे. तरी सदर मिळकतीचे बाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारे दान, गहाण, लिन, लिज, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, अन्न, वस्त्र, साठेखत, विसार पावती, बँकेचे तारण, कोर्ट वाद अगर कर्ज, जामीनकी अथवा अन्य कुठल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **सात (०७)** दिवसांचे आत आमचे खालील पत्त्यावर पुराव्यानिशी साक्षांकित प्रतींसह लेखी हरकत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजण्यात येईल. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केल्या जाणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. कळावे, ही टायटल व्हेरिफिकेशन नोटीस. दि. २५.८.२०२५

सही/- ॲड. बापू विजय निकम
ऑ. : बीई १२+१३, ठक्कर्स बाजार कॉम्प्लेक्स, नवीन सीबीएस, नाशिक. मो. ९९६०४५४५८५

टायटल व्हेरीफिकेशनकामी जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, **मौजे सिन्नर** ४ येथिल मिळकत – **स.नं. ४४९/१, क्षेत्र १ हे. ६३ आर + पो. ख. ० हे. ०१ आर आकार रु. ३.१२ पै.** यापैकी **श्री. निवृत्ती भरत धरम व अजय रामचंद्र शिंदे** यांचे **मालकीचे क्षेत्र ० हे. १८.५० आर** सदरची मिळकत वरील मालक यांचे मालकिची व कब्जा उपभोगात असून सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची असून कोणत्याही जडजोखमेत गुंतविलेली नाही, असे मिळकत मालकांचे म्हणणे आहे. सदर मिळकत विक्रीचा व्यवहार आमचे पक्षकारांबरोबर निश्चित केलेला असुन व्यवहारापोटी विसाराची रक्कम स्विकारलेली आहे. तथापि सदर मिळकतीचे टायटल तपासण्यासाठी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आली आहे. सबब सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हितसंबंध अथवा गहाण, दान, लिन, लिज, विसारपावती, साठेखत, करारनामे इ. बोजा असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **१०** दिवसाचे आत खालील पत्त्यावर साक्षांकित कागदपत्रासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मुदतीत हरकत आली नाही तर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरुन त्याबाबतचे टायटल सर्टिफिकेट मिळकत मालकांना दिले जाईल. परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाही. कळावे. ही जाहीर नोटीस असे, सिन्नर, दि.२६/०८/२०२५ सही/-

आमचे मार्फत प्रसिध्द सही
श्री. आत्माराम पुंजाजी उगले, ॲडव्होकेट व नोटरी
श्री. अनिरुध्द आत्माराम उगले, ॲडव्होकेट
शॉप नं. ८, बालाजी कॉम्प्लेक्स, विजयनगर, सिन्नर. मो.९८५०१९८८५५

महाराष्ट्र शासन
संस्था व्यवस्थापन समिती, द्वारा कवी कुसुमाग्रज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था निफाड, जि. नाशिक

पाहीजेत

औद्योगिक प्रशिक्षण संस्था निफाड, जि. नाशिक या संस्थेमध्ये पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप अंतर्गत एका सत्राकरीता (२०२५-२०२६) कंत्राटी तत्वावर ११ महिन्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात खालील पदे भरावयाची आहेत. इच्छुक व पात्र उमेद्वारांनी दिनांक २८/०८/२०२५, वार गुरुवार रोजी दुपारी ठिक ०१.०० वाजता सर्व मुळ व झेरॉक्स प्रमाणपत्रासह संस्थेमध्ये मुलाखतीसाठी हजर रहावे.

शिल्पनिदेशक	संधाता (०१ पद IMC), विजतंत्री (०४ पद IMC), कोपा (०१ पद IMC), नळकारागीर (१ पद IMC), जोडारी (०२ पद IMC)

शैक्षणिक पात्रता : - DGET च्या नॉर्म्सनुसार शैक्षणिक पात्रता डिग्री / डिप्लोमा / आयटीआय - CTI/CITS उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच संबंधित क्षेत्रातील कामाचा शिकविण्याचा कमीत कमी ०३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. वरील पदासंबंधित सर्व अधिकार संस्थेने राखुन ठेवलेले आहे.

वेतन - शैक्षणिक पात्रता व अनुभवावर आधारीत

अधिक माहितीकरीता सचिव संस्था व्यवस्थापन समिती, द्वारा कवी कुसुमाग्रज शासकीय औ.प्र. संस्था, निफाड, जि. नाशिक. दूरध्वनी क्र. ०२५५० - २४१५८४ येथे संपर्क साधावा.

शिक्का सही/- प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था निफाड, जि. नाशिक

टायटल व्हेरिफिकेशनसाठी जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, **नाशिक शहर – १**, ता. जि. नाशिक येथील **सर्व्हे नंबर १२/अ/७/३/८/पै/प्लॉट/२ यांसी क्षेत्र ११७२.६३ चौ.मी.** ही बिनशेती प्लॉट मिळकत **श्री. अतुल एकनाथ एकबोटे** यांची खरेदी मालकीची व प्रत्यक्ष कब्जावहिवाटीतील मिळकत असून त्यांनी मिळकतीचे टायटल क्लिअरन्स सर्टिफिकेट देणेची आमचेकडे मागणी केली आहे. तथापि टायटल क्लिअरन्स सर्टिफिकेट देणेपूर्वी प्लॉट मिळकतीचे निर्वेधपणाची तपासणी करणेसाठी सदरची नोटीस प्रसिध्द केलेली आहे.

सबब सदरचे प्लॉट मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लिन, लिज, अन्नवस्त्र, मृत्युपत्र, बक्षीसपत्र, साठेखत, विसार पावती, कोर्ट वाद, बँक बोजा, जप्ती, जामीनकी, विकसन करारनामा, जनरल मुखत्यारपत्र वा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क अगर हितसंबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत आमचेकडे खालील पत्त्यावर पुराव्याचे मूळ कागदपत्रांसह लेखी हरकती नोंदवाव्यात. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरील प्लॉट मिळकत ही निर्वेध आहे असे समजण्यात येईल व तसा 'ना हरकत दाखला' संबंधितांना देण्यात येईल. मुदतीनंतर व पुराव्याचे कागदपत्रांशिवाय घेतलेल्या तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व त्या हरकती मिळकतीचे मालक, त्यांचेतर्फे प्राधिकृत इसम व मिळकतीवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी. नाशिक. कळावे, ही जाहीर नोटीस. तारीख :– २५/८/२०२५.

आमचे मार्फत प्रसिध्द
सही/– श्री. सुनिल रामभाऊ सासले, ॲडव्होकेट
ऑफिस नंबर २३१/अ, दुसरा मजला, मेघदूत शॉपिंग सेंटर, सी.बी.एस. समोर, नाशिक.

टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन :** तुकडी जिल्हा नाशिक, पोटतुकडी तालुका निफाड पैकी यांसी एकूण क्षेत्र **मौजे चेहडी खुर्द** या गावचे शिवारातील **गट नं. ६६** यांसी **एकूण क्षेत्र ०५ हे. ९३ आर पैकी जमीन मालक लक्ष्मण शिळुभाऊ शिंदे यांचे स्वतंत्र आणेवारीचे ०० हे. ६३ आर** या क्षेत्रापैकी संपादित क्षेत्र वजा जाता हे. ५३ आर ही मिळकत. सदर मिळकतीचे टायटलसंदर्भाने सदरची नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे. सबब या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, उपरोक्त नमूद मिळकतीवर कुणाचाही कुठल्याही प्रकारचा चार्ज अगर क्लेम जसे विसार पावती, साठेखत करारनामा, विकसन करारनामा, गहाण, लिन, लिज, मुखत्यारपत्र, दान, लिन, बक्षीसपत्र, जामीनकी इत्यादी असल्यास आमचे खालील नमूद पत्त्यावर आजपासून **०७ दिवसांच्या आत** पुराव्याच्या कागदपत्रांनिशी समक्ष येवून हरकत नोंदवावी. मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनबोजाची अशी आहे असे समजून मिळकतीचे टायटल व्हेरिफिकेशनचा दाखला पुढील व्यवहाराकामी देण्यात येईल. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. कळावे, ही टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहीर नोटीस. दिनांक : २५/०८/२०२५ आमचेमार्फत प्रसिध्द.

सही/- रविंद्र एन. साळवे, ॲडव्होकेट
८, वैतरा बिल्डींग, श्रीरामनगर सोसायटी, दत्तमंदिर चौक, नाशिकरोड, ता. जि. नाशिक, **मो. नं. ९८२२८२२९०२**

टायटल व्हेरिफिकेशन नोटीस

तमाम लोकांना कळविण्यात येते की, पोटतुकडी तालुका नाशिक पैकी नाशिक महानगरपालिका हद्दीतील **मौजे चुंचाळे** या गावचे शिवारातील बिनशेती मिळकत यांसी **गट नंबर ६४/अ/प्लॉट/५७ यांसी एकूण क्षेत्र ३२५.०० चौ.मी.** ही प्लॉट मिळकत. उपरोक्त नमूद मिळकत ही **धिरेन्द्र अजित वाघ व पूनम धिरेन्द्र वाघ** यांचे मालकीची असून सदर मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची आहे अशी खात्री असून सबब, त्यांनी सदर मिळकतीचे स्वामित्व हक्क तपासणीचे काम आमचेवर सोपविलेले आहे. त्यासाठी सदरील टायटल व्हेरिफिकेशनकामी सदर नोटीस प्रसिद्ध केलेली आहे. तरी सदर मिळकतीचे बाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारे दान, गहाण, लिन, लिज, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, अन्न, वस्त्र, साठेखत, विसार पावती, बँकेचे तारण, कोर्ट वाद अगर कर्ज, जामीनकी अथवा अन्य कुठल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **सात (०७)** दिवसांचे आत आमचे खालील पत्त्यावर पुराव्यानिशी साक्षांकित प्रतींसह लेखी हरकत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजण्यात येईल. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केल्या जाणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. कळावे, ही टायटल व्हेरिफिकेशन नोटीस. दि. २५.८.२०२५

सही/- ॲड. बापू विजय निकम
ऑ. : बीई १२+१३, ठक्कर्स बाजार कॉम्प्लेक्स, नवीन सीबीएस, नाशिक. मो. ९९६०४५४५८५

टायटल व्हेरीफिकेशन नोटीस

तमाम लोकांना कळविण्यात येते की, **१. मिळकतीचे वर्णन :–** तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका सिन्नर, पैकी जिल्हा परीषद नाशिक व तालुका पंचायत समिती सिन्नरचे हद्दीतील **मौजे देवपुर**, ता. सिन्नर, जि. नाशिक या गावाचे शिवारातील मिळकत सिटी सर्व्हे नं. ५८९ यासी क्षेत्र ३७६.६० चौ.मि यापैकी आमचे मालकीचे व हिश्श्याचे क्षेत्रापैकी २८२.४५ चौ.मि बखळ मिळकत व यांसी देवपुर ग्रामपंचायत येथील नामे श्री. बाळासाहेब नरहरी दिवे यांचे नावे असलेले ग्रामपंचायत अनु क्रं. ७०८ मालमत्ता क्रं. ४९१ अ यांसी क्षेत्र १०० चौ. मी. व मिराबाई प्रभाकर साळवे उर्फ सौ. मिराबाई बाळासाहेब दिवे यांचे नावे असलेले ग्रामपंचायत अनु क्रं. ७०९ मालमत्ता क्रं. ४९१ व यांसी क्षेत्र १०० चौ. मी. व सौ. झुंबरबाई बाळासाहेब दिवे यांचे नावे असलेले ग्रामपंचायत अनु क्रं. ७१० मालमत्ता क्रं. ४९१ क यांसी क्षेत्र १०० चौ. मी. ही श्री. बाळासाहेब नरहरी दिवे, मिराबाई प्रभाकर साळवे उर्फ सौ. मिराबाई बाळासाहेब दिवे, झुंबराबाई बाळासाहेब दिवे हि संपुर्ण मिळकत आमचे मालकीचे क्षेत्र असुन वरील मिळकतीचा त्यांनी विक्रीचा व्यवहार करण्याचे ठरविले आहेत. तसेच त्यांनी विसार घेऊन विसारपावती केलेली आहे. वरील मिळकत हि निर्वेध निर जोखीम व कोणत्याही प्रकारचा बोजा, उसणवार, तारण, दान, लिज, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, जप्ती, जामीनकी, कर्ज प्रकरण, मृत्युपत्र, साठेखत, कोर्ट मनाईहुकूम, करारनामा,जनरल मुखत्यार, वारस हक्क, खावटी, जामिनकी, विसारपावती, किंवा अन्यहित संबंध असल्यास नोटीस प्रसिध्द झालेपासुन ७ दिवसाचे आत लेखी हरकती घ्याव्यात, हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे. असे समजुन व्यवहार पुर्ण केला जाईल. परस्पर वर्तमान पत्रात दिलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, हि जाहीर नोटीस.

आमच्या मार्फत प्रसिध्द
श्री. गोपाल चिंधूजी बर्के, ॲडव्होकेट व नोटरी
सिन्नर न्यायालय, सिन्नर ता. सिन्नर जि. नाशिक

टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की,
मिळकतीचे वर्णन: तुकडी जिल्हा नाशिक, पोटतुकडी तालुका नाशिक पैकी मौजे आगरटाकळी शिवारातील **भूमापन क्र. व उपविभाग २४/२ड/२५/ अबकडई/१/२/३/प्लॉट/५३ यांसी बिनशेती क्षेत्र ३.१० आर. चौ.मी.** यांसी आकार रु. १४८.८० पैसे यांसी चतुःसीमा रेकॉर्ड ऑफ राईटस्प्रमाणे.

उपरोक्त वर्णन केलेली मिळकत ही **वसंत फकीरराव सोमवंशी** यांचे मालकीची असून सदर मिळकत त्यांचे कब्जेत, वहिवाटीत व उपभोगात आहे. सदर मिळकतीचे टायटल व्हेरिफिकेशनकामी मिळकतीचे मालक यांनी आमची नेमणूक केलेली आहे. तसेच मिळकत मालकांनी सदर मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची तसेच कोणत्याही प्रकारचे करारमदारमध्ये अडकलेली नसल्याचे खात्रीलायक सांगितलेले आहे. याउपरही सदर मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचे हक्क, अधिकार, हितसंबंध तसेच करारमदार असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ (सात) दिवसांचे आत आमचे खालील पत्त्यावर कागदपत्रांचे पुराव्यासह हरकत नोंदवावी. मुदतीनंतर अथवा परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. सदर मिळकतीबाबत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून त्याबाबतचा दाखला संबंधित पक्षकारांना देण्यात येईल. कळावे, ही टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहीर नोटीस नाशिक तारीख :– २५/०८/२०२५

आ.मा.प्र. दिली
सही/- श्री. बाळासाहेब पुंडलिकराव मत्सागर, ॲडव्होकेट व नोटरी
चेंबर नं. २०४/२, जिल्हा न्यायालय आवार, नाशिक.

टायटल व्हेरिफिकेशन जाहीर नोटीस

तमाम लोकांस या टायटल व्हेरिफिकेशन जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन :** तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक पैकी व उपविभाग **मौजे दुडगांव** या गावाचे शिवारातील शेत मिळकत यांसी **भूमापन व उपविभाग क्र. १५०/ब/६ यांसी क्षेत्र ०४ हेक्टर २६ आर + पोट खराबा ०० हेक्टर ९६ आर असे एकूण क्षेत्र ०५ हेक्टर २२ आर यांसी आकार रुपये ३.७३ पैसे या मिळकतींपैकी दक्षिण बाजूकडील श्री. भास्कर काळू ढगे यांचे क्षेत्र ०२ हेक्टर ०१ आर यांसी आकार रुपये १.७६ पैसे या मिळकतींपैकी उत्तर बाजूकडील क्षेत्र ०० हेक्टर ४० आर** ही शेत मिळकत. वर वर्णन केलेली शेत मिळकत ही **श्री. भास्कर काळू ढगे** यांची स्वकष्टार्जित मालकीची व स्वतंत्र फरोक्त खरेदीखताने मालकीहक्काची व प्रत्यक्ष कब्जा उपभोगाची मिळकत आहे. वरील मिळकत निर्वेध बिनबोजाची आहे असे वरील मालकांनी खात्रीने सांगितले आहे व मिळकतीचे मालकीहक्क तपासण्यास सांगितले आहे. त्यासाठी ही टायटल व्हेरिफिकेशन जाहीर नोटीस प्रसिध्द केली आहे. अशा परिस्थितीत वरील मिळकतीत कोणाचाही कोणत्याही स्वरुपाचा हक्क, अधिकार अथवा मिळकत गहाण, दान, लिन, लिज, चार्ज, जप्ती, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, कूळ, वहिवाट, हद्दीचा वाद, रस्त्याचा वाद, बँक कर्ज, खासगी कर्ज, अगर मिळकत कोणत्याही जडजोखमीत, कराराने, तोंडी बोलीने अगर मिळकतीबाबत कोर्ट वाद, मनाई हुकुमामध्ये असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **१५ दिवसांचे आत** आमचे खालील पत्त्यावर आपले हक्काबाबत असलेल्या कागदपत्र, दस्तासह लेखी हरकत नोंदवावी व विनादस्तऐवज अगर परस्पर वृत्तपत्रातील हरकतींचा विचार केला जाणार नाही व मुदतीनंतर वरील मिळकत निर्वेध बिनबोजाची आहे असे समजण्यात येईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती वरील मिळकतीवर व आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी. ही टायटल व्हेरिफिकेशन जाहीर नोटीस नाशिक दिनांक : २५/०८/२०२५.

श्री. सुनिल शां. दरगोडे, ॲडव्होकेट
पत्ता :– चेंबर नं. २१५, बि.नं. २, जिल्हा न्यायालय आवार, नाशिक.

टायटल व्हेरिफिकेशनसाठी जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, **मौजे नाशिक शहर**-२, ता. व जि.नाशिक येथील **सर्व्हे नं. ४७१/१/३/प्लॉट/३ आणि सर्व्हे नं. ४७१/१/४/प्लॉट/४** यांसी **एकूण क्षेत्र १७७०.२५ चौ.मी.** या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या **अमृत सागर पार्क को-ऑप.हौसिंग सोसायटी लि., नाशिक** या इमारतीमधील **दुसरे** मजल्यावरील **फ्लॅट नं. बी-१०** यांसी **बांधीव क्षेत्